# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/१०/२०२५ (गुरूवार )**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीताविरूध्द पो.स्टे. रामटेक ची कारवाई
## ( एक आरोपी अटक, एकूण किं. ४,४०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त)

**पोलीस स्टेशन रामटेक** :—दिनांक ३०/१०/२०२५ रोजी पो.स्टे. रामटेक येथील पोलीस स्टॉफसह पेट्रोलींग करीत असतांना मौजा हिवरा किट्स कॉलेज जवळ रामटेक येथे वाहन टाटा एस क्र एम एच ३६ एफ ०७६१ हे संशयास्पद स्थितीत दिसून आल्याने स्टॉफ च्या मदतीने सदर वाहनास थांबवून पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या ०२ लाल रंगाच्या गोवंश घेवुन जात असतांना मिळुन आल्याने सदर वाहन ४००००० व०२ लाल रंगाच्या **गोवंश जनावरे** असे मिळुन आले. वाहन चालक आरोपी नामे १. संतोश दिनकर मेहर वय ३९ वर्ष रा. रामाळेष्वर वार्ड रामटेक आरोपी नामे २. महादेव गणपत गोल्हर वय ७२ वर्ष रा. सुभाष वार्ड रामटेक यास गोवंश जनावरे वाहून नेण्याच्या परवान्याबाबत विचारपूस केली असता त्याचे जवळ कोणतेही परवाना नसल्याचे सांगितले व वाहन चालकाने नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक** वाहन टाटा एस क्र एम एच ३६ एफ ०७६१ मध्ये ०२ लाल रंगाच्या गोवंश घेवुन जात असतांना मिळुन आल्याने सदर वाहन ४,००,०००/— रू. व ०२ लाल रंगाच्या गोवंश किंमती ४०,०००/— रू असा एकुण ४,४०,०००रू चा माल मोक्यावरून **मुददेमाल जप्त केला.** आरोपी नामे १. संतोश दिनकर मेहर वय ३९ वर्ष रा. रामाळेष्वर वार्ड रामटेक आरोपी नामे २. महादेव गणपत गोल्हर वय ७२ वर्ष रा. सुभाष वार्ड रामटेक याच्या विरूध्द **कलम ११(१), ११ (१) (डी), ११ (१) (इ), ११ (१) (एफ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम ५, ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम १८४ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :– दिनांक ३०/१०/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी केळवद पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा बिहाडा फाटा ०८ कि.मी पश्चिम येथे पेट्रोलिंग करित असतांना चार चाकी वाहन क्र एम.एच –३१ डी सी ७६३७ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनावर एका चुंगडीमध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आला. मोटर सायकल चालक **आरोपी नामे १)** जावेद दद्दा शेख, वय – ३५ वर्ष, व **आरोपी नामे २)** श्री दिलीप रामदास महाजन वय ३६ वर्ष, दोन्ही रा. गुमगाव वॉर्ड क्रं ०३, ता. हिंगणा, जि. नागपुर **याचे ताब्यातुन १)** पानमसाला विमल बॅन्ड **२)** सुगंधित हुक्का शिशा तंबाखु होला बॅन्ड **३)** सुगंधित तंबाखु मन बॅन्ड **४)** जाफरानी जर्दा सुगंधित तंबाखु रिमझिम ब्रॅन्ड **५)** सुगंधित तंबाखु य गोल्डन युग ब्रॅन्ड **६)** पानमसाला – राजश्री ब्रॅन्ड **७)** सुगंधित तंबाखु मजा १०८ ब्रॅन्ड असा एकुण अंदाजे २३८.९ किलो प्रतिबंधित साठा, किंमत रू. २,५०,२०६/– तसेच चारचाकी वाहन अंदाजे कि. रू. ६,५०,०००/– व दोन वन प्लस कंपनी चा एक मोबाईल फोन प्रत्येकी किंमती कि. १५,०००/– अशी एकुण जुमला किमत रू. ९,३०,२०६/– या प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे देवलापार येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३ (५) भारतीय न्याय संहीता –२०२३ सहकलम २६(१), २६(२) (iv), २७(३) (ई), ३०(२) (ए), अन्न सुरक्षा व मानक अधिनियम – २००६, सहकलम ३(१)(zz)(III), शिक्षापात्र कलम ५९ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई

**(एकूण २ आरोपी विरूध्द २ गुन्हे नोंद. एकूण २,०२०/— रू. चा मुद्देमाल जप्त)**

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ३०/१०/२०२५ रोजी पो.स्टे. मौदा येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून मौजा गुमथळा येथे अवैधरित्या पांढ—या थैलीमध्ये देशी दारू भिगरी सत्रा नं १ च्या १८० एम एल च्या २२ निपा प्रत्येकी किमती ७० रू प्रमाणे एकूण १५४० रू चा माल जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५ (ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ३०/१०/२०२५ रोजी पो.स्टे. उमरेड येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून शिरपुर उमरेड ०९ किमी पश्चिम येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे** भरत फागोजी दिघोरे वय ५८ वर्ष रा शिरपुर ता उमरेड जि. नागपुर वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू च्या ०६ नीप प्रत्येकी ८० रू. प्रमाणे १८० एमएली भरलेली एकुन एमएल १०८० एमएल एकुन किं. ४८० रू.चा माल जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५ (ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला.

**(अशाप्रकारे एकूण २ आरोपी विरूध्द २ गुन्हे नोंद व एकूण २,०२०/— रू. चा मुद्देमाल जप्त**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक ३०/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे श्री. प्रशांत मिसाळ, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वेलतूर यांनी परिसरातील नागरिकांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

१. ऑनलाईन गेमिंग च्या आर्थिक फसवणुकीला बळी पडु नका.

२. अधिकृत संकेतस्थळ किंवा ॲप पडताडणी करूनच खरेदी करा. अनोळखी खरेदी लिंक वर क्लिक करू नका.

३. मोबाईल मध्ये **APK** फाईल डाउनलोड करून नका.

४. फसव्या लोन ॲप च्या अमिषाला बळी पडु नका.

५. कोणत्याही आमिषाला बळी पडु नका सायबर गुन्हेगाराच्या जाळयात अडकु नका.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने